| MHKO110017112022 | | | |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | - | १५/१०/२०२२ |
| | नोंद दिनांक | - | १८/१०/२०२२ |
| | निकाल दिनांक | - | ०२/०७/२०२६ |
| | कालावधी | - | वर्ष महीने दिवस |
| | | | ०३ ०८ १८ |

# प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठवडगाव यांचे न्यायालयात

## (पिठासिन अधिकारी - श्रीमती. आर. एस. मोरे)

**नियमित फौजदारी खटला क्र. १६३/२०२२**

**नि. क्र. १८ / बी**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन** तर्फे पोलीस ठाणे अधिकारी,<br>वडगांव पोलीस ठाणे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर |
| **अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ** | श्री. व्ही. पी. कुसुरकर, सहा. सरकारी अभियोक्ता. |
| **आरोपी** | **आकाश राजेंद्र मिरजकर,**<br>व.व.२२, धंदा - खाजगी नोकरी,<br>रा. पिसे गल्ली, पेठवडगाव,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर. |
| **आरोपी तर्फे विधिज्ञ** | श्री. एस. एल. बोभाटे |

**भाग–ब**

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये)

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | २२/०१/२०२२ ते २५/०३/२०२२ |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | १८४/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | १५/१०/२०२२ |
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | २१/११/२०२५ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | ०९/०६/२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | ०२/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०२/०७/२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | अंतिम आदेशाप्रमाणे |

## आरोपींविषयी माहिती

| अनु. क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपा- तील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|
| **१.** | **आकाश राजेंद्र मिरजकर** | १९/०५/२०२२ | २०/०५/२०२२ | भा.दं.वि.सं. कलम ५००,५०४,५०६, ५०७,५०८,५०९ व माहीती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(क),६६(ड),६६(इ) अन्वये | निर्दोष मुक्तता | --- |

## न्यायनिर्णय

*( आज दिनांक ०२ जुलै २०२६ रोजी घोषित )*

आरोपीवर भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ५००, ५०४, ५०६, ५०७, ५०८, ५०९ व माहीती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(क),६६(ड),६६(इ) प्रमाणे गुन्हा केल्याबाबत दोषारोप आहे.

**अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे** -

०२. सदरचा गुन्हा आंबा रोड, पोळ गल्ली, पेठवडगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे घडला आहे. दि. २२/०१/२०२२ पासून ते दि. २५/०३/२०२२ दरम्यान वेळोवेळी आरोपी आकाश राजेंद्र मिरजकर यांनी फिर्यादी यांची ओळख चोरून फिर्यादीचे नावाचे सोशल मिडीयावर फेसबुक वर सागर शिंदे या नावाचे बनावट खाते बनवून त्यावर फिर्यादी यांचे फोटो अपलोड करून सदर फेसबुक अकाऊंट वरून राज पाटील यांचा भावपूर्ण

श्रध्दांजली म्हणून फोटो वायरल करून वडगाव शहरातील नामवंत व्यक्तींना त्यापैकी भुषणराव सालकर यांना "ये लवडया, कोण तु, तुझ्या आईची गांड" अशी वाईट शिवीगाळ तसेच दमदाटी केली. तसेच, ८५९१५१९१०२ या व्हॉट्सअप नंबरवर फिर्यादीचा फोटो लावून गावातील प्रतिष्ठीत व्यक्तींना त्यापैकी प्रवीण माने, अक्षय माने यांना वाईट शिवीगाळ करून फिर्यादी यांना मारहाण करून त्याच्या जीवाला धोका निर्माण व्हावा या उद्देशाने व्हॉट्सअपवर मॅसेज केले. सबब, फिर्यादीने सदर घटनेबाबत वडगांव पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली.

०३. सदर फिर्यादला अनुसरून वडगांव पोलिस ठाणे येथे गुन्हा रजि. क्र.१८४/२०२२ असा नोंद झाला. गुन्हयाचा तपास श्री. बी. ए. तळेकर, पोलीस निरीक्षक यांचेकडे सोपविण्यात आला. तपासी अधिकारी यांनी संबंधीत साक्षीदारांचे बयान नोंदवून घेतले, घटनास्थळाचा पंचनामा केला, मुद्देमाल जप्त केला व आरोपीविरुद्ध पुरेसा पुरावा मिळून आल्यामुळे त्यांनी आरोपीविरुद्ध फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १७३ प्रमाणे दोषारोपपत्र सादर केले.

०४. आरोपी हजर झाल्यावरून **निशाणी क्र.०८** वर आरोपीवर भारतीय दंड संहिता कलम ५००, ५०४, ५०६, ५०७, ५०८, ५०९ व माहीती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(क),६६(ड),६६(इ) अन्वये दोषारोप ठेवण्यात आला. सदर दोषारोप आरोपीला मातृभाषेत वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपीने त्याच्यावरील आरोप नाकारून खटल्याची संपरिक्षा घेण्याची मागणी केली.

०५. अभियोग पक्षाने सदर प्रकरणात साक्षीदार क्र.१ - सागर नामदेव शिंदे - फिर्यादी यांची साक्ष **निशाणी क्र.१५** वर नोंदवली. अभियोग पक्षाने आपली भिस्त दि. २५/०३/२०२२ रोजीच्या जबाबावरील फिर्यादीची सही - **निशाणी क्र.१६** इत्यादी कागदोपत्री पुराव्यावर ठेवली. आरोपीविरुद्ध कोणताही आक्षेपार्ह पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वयेचे निवेदन नोंदवण्यात आले नाही. **निशाणी क्र. १४** च्या पुरसिस नुसार फिर्यादी व आरोपी यांचेदरम्यान तडजोड झालेली असून आरोपी विरूध्द कोणतीही तक्रार राहिलेली नाही. फिर्यादी यांना प्रस्तुतची केस चालविणेची

नसून अन्य कोणताही साक्षीदार तपासायचा नाही. **निशाणी क्र. १७** वरील पुरसिस नुसार फिर्यादी यांना कोणत्याही प्रकारचा कागदोपत्री अथवा तोंडी पुरावा देणेचा नसल्याचे कथन केले. सदरची केस मध्ये नि. १ च्या आदेशानुसार अभियोग पक्षाचे पुरावे बंद करण्यात आले.

०६. अभियोग पक्षाचे विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. पी. कुसुरकर व आरोपीचे विद्वान विधिज्ञ श्री. एस. एल. बोभाटे यांचा युक्तिवाद ऐकला.

०७. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकुन व अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर माझे विवेचनाकरीता खालील मुद्दे उपस्थित झाले. त्या कामी कारणमीमांसेसह निष्कर्ष खालील प्रमाणे नोंदवले आहेत.

| ***अ.क्र.*** | ***मुद्दे*** | ***निष्कर्ष*** |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दि. २२/०१/२०२२ पासून ते दि. २५/०३/२०२२ दरम्यान आरोपीने फिर्यादीचे नावाचे फेसबुक वर बनावट खाते बनवून त्यावर फिर्यादी यांचे फोटो अपलोड करून सदर फेसबुक अकाऊंट वरून राज पाटील यांचा भावपूर्ण श्रध्दांजली म्हणून फोटो वायरल केला तसेच ८५९१५१९१०२ या व्हॉट्सअप नंबरवर फिर्यादीचा फोटो लावून गावातील प्रतिष्ठीत व्यक्तींना वाईट शिवीगाळ केले व त्या अन्वये भारतीय दंड संहिता कलम ५०० प्रमाणे गुन्हा केला आहे? | ***नकारार्थी*** |
| २) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फेसबुक व व्हॉट्सॲप अकाउंट वरून प्रतिष्ठीत व्यक्तींना "नादाला लागू नको, नाहीतर तुला सोडणार नाही, ये लवडया, कोण तू, तुझ्या आईची गांड"अशी शिवीगाळ केली व त्या अन्वये भारतीय दंड संहिता कलम ५०४ प्रमाणे गुन्हा केला आहे? | ***नकारार्थी*** |

| | | |
|---|---|---|
| ३) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने व्हॉट्सॲप अकाउंट वरून फिर्यादीस जिवे मारण्याची धमकी दिली व त्या अन्वये भारतीय दंड संहिता कलम ५०६ प्रमाणे गुन्हा केला आहे? | *नकारार्थी* |
| ४) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने निनावी संदेशाद्वारे फिर्यादीची ओळख लपवून गुन्हेगारी धमकी दिली व त्या अन्वये भारतीय दंड संहिता कलम ५०७ प्रमाणे गुन्हा केला आहे? | *नकारार्थी* |
| ५) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने स्वतःची फिर्यादी अशी ओळख करून आणि त्याच्या वतीने सोशल मीडिया अकाउंट वर पोस्ट केली व त्या अन्वये भारतीय दंड संहिता कलम ५०८ प्रमाणे गुन्हा केला आहे? | *नकारार्थी* |
| ६) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने एखाद्या महिलेचा अपमान करण्याच्या उद्देशाने शब्द वापरले व त्या अन्वये भारतीय दंड संहिता कलम ५०९ प्रमाणे गुन्हा केला आहे? | *नकारार्थी* |
| ७) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, उपरोक्त नमूद दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपीने फिर्यादीच्या संमतीशिवाय आणि त्याच्या गोपनीयतेचा भंग करणाऱ्या परिस्थितीत, त्याच्या फेसबुक खात्याचा फसवणुकीने वापर करून एका अनोळखी व्यक्तीला फोटो पाठवले व त्या अन्वये माहीती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(क),६६(ड),६६(इ) प्रमाणे गुन्हा केला आहे ? | *नकारार्थी* |

| | | |
|---|---|---|
| ८) | अंतिम आदेश काय ? | ***आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.*** |

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>मुद्दा क्र.१ ते ७ करिता</u> -

०८. मुद्दा क्र.१ ते ७ हे एकमेकांशी निगडित असल्याने त्यांच्या कारणांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता सदर मुद्दे विवेचनाकरिता एकत्रित विचारात घेण्यात आलेले आहेत.

०९. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदार क्र.१ - सागर नामदेव शिंदे यांनी त्यांच्या मौखिक पुराव्यादरम्यान असे नमूद केले आहे की, दिनांक २२/०१/२०२२ रोजी त्यांच्या दुस-या अकाउंटला त्याचे फोटो दिसून आले होते किंवा कसे हे त्यांना आठवत नाही. तसेच अकाउंटचे URL संदर्भात सुध्दा त्यांना काही माहित नाही.

१०. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या उपरोक्त फिर्यादी साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य करणारी साक्ष दिली नाही. सबब सरकारी वकिलांनी सदर साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परंतु सदर साक्षीदाराने आरोपीविरुद्ध कोणतीही आक्षेपार्ह विधाने केली नाहीत. साक्षीदार क्र.१ ने त्याच्या उलटतपासा दरम्यान त्यांची व आरोपीची कोर्टाच्या बाहेर तडजोड झालेली आहे. त्यामुळे अभियोग पक्षास सहकार्य होईल अशी कोणतीही महत्त्वाची कबुली सरकारी वकील सदर साक्षीदाराच्या तोंडून मिळवू शकले नाहीत. त्यामुळे आरोपीविरुद्ध कोणताही आक्षेपार्ह पुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच त्यांना दि. २५/०३/२०२२ रोजीचा जबाब दाखविण्यात आला. त्यावर त्यांची सही असल्याचे त्यांनी मान्य केले. परंतु पोलिसांना सांगितल्याप्रमाणे त्यांचा जबाब घेतलेला नाही असे कथन केले. प्रस्तुत कामातील मूळ फिर्यादीने **निशाणी क्र.१४** वर पुरसिस दाखल करून फिर्यादी व आरोपी यांच्यात आपसात तडजोड झाली असल्याचे कथन केले. सबब अभियोग पक्षातर्फे इतर कोणत्याही साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली नाही.

११. अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदाराच्या साक्षी पुराव्याचे अवलोकन करता,दि. २२/०१/२०२२ पासून ते दि. २५/०३/२०२२ दरम्यान वेळोवेळी आरोपी आकाश राजेंद्र मिरजकर यांनी फिर्यादी यांची ओळख चोरून फिर्यादीचे नावाचे सोशल मिडीयावर फेसबुक वर सागर शिंदे या नावाचे बनावट खाते बनवून त्यावर फिर्यादी यांचे फोटो अपलोड करून सदर फेसबुक अकाऊंट वरून राज पाटील यांचा भावपूर्ण श्रध्दांजली म्हणून फोटो वायरल करून वडगाव शहरातील नामवंत व्यक्तींना त्यापैकी भुषणराव सालकर यांना "ये लवडया, कोण तु, तुझ्या आईची गांड" अशी वाईट शिवीगाळ तसेच दमदाटी केली. तसेच, ८५९१५१९१०२ या व्हॉट्सअप नंबरवर फिर्यादीचा फोटो लावून गावातील प्रतिष्ठीत व्यक्तींना त्यापैकी प्रवीण माने, अक्षय माने यांना वाईट शिवीगाळ करून फिर्यादी यांना मारहाण करून त्याच्या जीवाला धोका निर्माण व्हावा या उद्देशाने व्हॉट्सअपवर मॅसेज केले, हे अभियोग पक्षाने निःसंशय सबळ पुराव्यानिशी शाबीत केलेले नाही. सबब आरोपी सदर खटल्यातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ७ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

<u>मुद्दा क्र.८ करीता</u> -

१२. मुद्दा क्र.१ ते ७ करिता मी माझे निष्कर्ष नकारात्मक नोंदवलेले आहेत. आरोपीवरील आरोप अभियोग पक्षाने रास्त संशयापलीकडे सिद्ध केलेले नाहीत. त्यामुळे आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे. सबब, आरोपी त्याच्यावरील आरोपांमधून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. वरील सर्व कारणांच्या विवेचनावरून, मुद्दा क्र. ८ चे निष्कर्षाकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १) | आरोपी - **आकाश राजेंद्र मिरजकर** याची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम ५००, ५०४, ५०६, ५०७, ५०८, ५०९ व माहीती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(क), ६६(ड), ६६(इ) मधील गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| २) | आरोपीचे बंधपत्र व जामीनकतबा रद्द करण्यात येत आहे. |
| ३) | आरोपीला असे निर्देशित करण्यात येते की, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये या न्यायालयाचे न्यायनिर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील अथवा अर्ज दाखल झाल्यास त्यांच्यासमोर हजर रहाण्याकरिता सहा महिन्यांच्या कालावधीकरिता त्याने रक्कम रु.१५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र व रक्कम रु.१५,०००/- चे जामीन बंधपत्र द्यावे. |
| ४) | जप्त मुद्देमाल, एक ओपो कंपनीचा A9 2020 निळ्या रंगाचा मोबाईल त्याचा IMEI no. 863251044522790, 863251044522782 असून हा फॅक्टरी रिसेट करण्यात यावा व अपील कालावधीनंतर सदर मोबाईलचा मालकी हक्क तपासून तो आरोपीस परत देण्यात यावा. |
| ५) | मोबाईल फोन मधील VI कंपनीचे सीम त्याचा नं. ७५१७४६१९१९ हे अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावे. |

( खुल्या न्यायालयात जाहीर व उदघोषित करण्यात आला.)

sd/-

पेठ-वडगांव **( आर. एस. मोरे)**

दिनांक - ०२/०७/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ-वडगांव

## भाग-क

## परिशिष्ट

## अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | सागर नामदेव शिंदे | १५ | फिर्यादी |

## अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १ | अ.नि.क्र. १६/ अ.सा.क्र.१ | दि. २५.०३.२०२२ च्या जबाबावरची फिर्यादीची सही |

sd/-

पेठ-वडगांव **( आर. एस. मोरे)**

दिनांक - ०२/०७/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पेठ-वडगांव